## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायकांळ)

जा.क्र. ५५९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः–०२/०९/२०१६

**१) दारु विक्रीच्या कारणावरुन महीलांना मारहान केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०१/०९/२०१६ रोजी १९.०० वा. दर. यातील फिर्यादी ही एकोडी गावाची दारुबंदी सदस्य असुन फिर्यादी ही व गावातील इतर ४ महीला यांचे सोबत कटकवार शळे समोर आरोपीच्या घरा समोरुन जाणा–या आमरोडवर आपसात चर्चा करीत असतांना यातील आरोपीतांनी संगनमत करुन आरोपीच्या घरुन निघालेल्या इसमास कशाला विचारपुस करता आम्ही दारु विक्री करीत नाही या कारणा वरुन आरोपीतांनी फिर्यादीस व तीच्या सोबतच्या महीलांना अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन फिर्यादीस ओढतांन करुन थापडबुक्यांनी मारहान करुन फिर्यादीचा सार्वजनीक ठिकाणी पानउतारा केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,३२३,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भजने पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) वाहन परवाना नसतांनी वाहन चालवतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०१/०९/२०१६ रोजी १५.०० ते १५.३० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकलवर वाहन परवाना नसतांनी ४ इसम बसवुन आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने, निष्काळजीपने चालवुन स्वतःचे मागे बसलेल्या इसमाचे जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन चालवितांना मिळुन आल्याने पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९ भांदवि. सहकलम ३/१८१ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पो. स्टे. पवनी हे करीत आहेत.

**३) दारूडया वाहन चालकांवर कारवाई. :–**

**अ)** दिनांक ०१/०९/२०१६ रोजी १४.३० वा. दर. आरोपी मोटार सायकल क्र. एमएच ४० के ७४०६ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल ही दारू पिवुन दारूच्या नशेत मुक्ताबाई शाळे समोर डांबरी रोडवर तुमसर येथे वाकडीतीकडी चालवितांना मिळुन आला. त्याचे डॉ. परिक्षण रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १८५(१) मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. श्रीवास पो.स्टे. तुमसर हे करीत आहे.

**४) विज पडुन महीलेचा मृत्यु . :–**

दिनांक ०१/०९/२०१६ रोजी १५.३० वा. दर. यातील मृतक श्रीमती गुंथन चुन्नीलाल पटले वय ५५ वर्ष, रा. डोंगरला ही आपल्या सुने सोबत शेतावरुन घरी मिळुन रस्त्याने जात असतांना अचानक विजेचा गळगळाट झाल्याने मोठया आवाजामुळे व विजेच्या शॉकामुळे मरण पावल्याचे फिर्यादीस दिसुन आल्याने असे फिर्यादी सैदुल मारोती पटले वय ५५ वर्ष रा. डोंगरला यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे तुमसर येथे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील चौकशी पोहवा. कळंबे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

५) तरुणाचा तलावाच्या पाण्यात बुडुन मृत्यु . :—

दिनांक ०१/०९/२०१६ रोजी १२.०० वा. दर. यातील मृतक महेश देवराम ब्राम्हणकर वय १८ वर्ष, रा. विरली खंदार हा तलावाचे पाण्यात बैल धुण्यास गेला असता बैल धुत असतांना पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी अनिल प्रभाकर ब्राम्हणकर वय १८ वर्ष रा. विरली खंदार यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे अडयाळ येथे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील चौकशी पोहवा. जाधव पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

(के.एच.धात्रक)
**प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा.**
**दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.